# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट १९४-२३** **दिनांक १९/०६/२०२३**

## गहाळ झालेला डेन्टल सर्जरीचा ३५ लाखाचा मुद्देमाल तक्रारदार यांना परत करण्यात नवघर पोलीस ठाणे व भाईदर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२/०६/२०२३ रोजी तक्रादार नामे डॉ. सचिन दुग्गड, रा. गंगापुर रोड, नाशिक हे डॉ. अमोल जाधव यांचे डॉ. माधवी हेल्दी स्माईल डेन्टल क्लिनीक, पुष्प निकेतन, मॅक्सेस मॉलचे पाठीमागे, भाईंदर प. येथे हॉस्पीटलमध्ये दातांचे सर्जरीसाठी त्यांचाकडील सर्जरीसाठी उपयोगात येणाऱ्या साधनांसह त्यांची सफेद रंगाची कार क्रमांक एम.एच-१५ बी.एक्स. ४२६० हिचेमधुन आले होते. त्यानंतर रात्री १०.०० वा. चे सुमारास डॉ. सचिन दुग्गड हे डॉ. माधवी हेल्दी स्माईल डेन्टल क्लिनीक येथे सर्जरी पुर्ण करुन परत जात असतांना त्यांनी त्यांचे डेन्टल सर्जरी साठी उपयोगात येणारे ३५ लाख रुपये किंमतीचे सामान डॉ. माधवी हेल्दी स्माईल डेन्टल क्लिनीकमध्ये काम करणारी महिला नामे धनश्री शिर्के हिला त्यांची कार क्रमांक एम.एच-१५ बी.एक्स.४२६० हिचेमध्ये ठेवण्यासाठी दिले होते. धनश्री शिर्के यांनी नजरचुकीने सदरचे सामान त्यांचा कारसारख्या दिसणाऱ्या सफेद रंगाच्या कारमध्ये ठेवले होते. सदरबाबत भाईंदर पोलीस ठाणेत मालमत्ता गहाळ रजि. क्र. १७५५३/२०२३ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती.

नमुद गहाळ मालमत्तेची किंमत ३५ लाख रुपये असल्याने नमुद मालमत्तेचा शोध घेणेकामी पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, मिरारोड विभाग यांनी आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथक व भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी संयुक्तरित्या नमुद गहाळ मुद्देमालाचा शोध घेत होते. नमुद गहाळ मालमत्तेच्या घटनास्थळाचे तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुचे अंदाजे ५५ सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यांचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन कार क्रमांक एम.एच.-०१ ए.सी.७०६९ हिचा शोध घेवुन कारमालक नामे श्री दिपक शिवप्रसाद अग्रवाल, रा. रुम नंबर १६०२, तिरुपती हाईट्स, फायरबिग्रेड ऑफीसचे जवळ, महेश्वरी रोड, भाईंदर प. ता.जि. ठाणे यांचे कारचे डिक्कीतुन सदरचे सामान हस्तगत करण्यात आले आहे. डॉ. सचिन दुग्गड यांनी कार तसेच दिपक शिवप्रसाद अग्रवाल यांचे कारचा रंग मिळता-जुळता असल्याने तसेच नमुद दोन्ही कार ह्या आजुबाजुस उभ्या केलेल्या असल्याने धनश्री शिर्के यांनी सदरचे सामान गैरसमजुतीने दिपक शिवप्रसाद अग्रवाल यांचे कार क्रमांक एम. एच.-०१ ए.सी. ७०६९ हिचेमध्ये ठेवले होते. तरी नमुद गाहाळ मालमत्तेचा शोध नुमद मुद्देमाल तक्रारदार नामे डॉ. सचिन दुग्गड, रा. गंगापुर रोड, नाशिक यांना स्वाधीन करण्यात आल्याने तक्रारदार यांनी तपास पथकाचे आभार व्यक्त केले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१ मिरारोड, श्री. उमेश माने-पाटील, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस

निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.नि. अभिजित लांडे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अंम. सुरजसिंग घुनावत, ओंकार यादव तसेच भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.फौ. अर्जुन जाधव, पो.अंम. संजय चव्हाण, गजानन चव्हाण यांनी केलेली आहे.



----ooo----